


# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक २८९ वा ❑ शुक्रवार दि.१६ जानेवारी २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

# पाळीदरम्यान वेदना गांभीर्याने समजून घेण्याची गरज

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

मासिक पाळी दरम्यान किशोरवयीन मुलींना व स्त्रीयांना होणाऱ्या वेदांकडे दुर्लक्ष होता कामा नये..या दरम्यानच्या काळात होणाऱ्या वेदनांकडे दुर्लक्ष न डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. पाळीतील वेदनांकडे दुर्लक्ष करू नका; त्यामागे गंभीर आरोग्य समस्या असू शकते, म्हणून वैद्यकीय सल्ला घेणे महत्त्वाचे आहे. भारतीय समाज मासिक पाळीबाबत अंजुगनही अज्ञानी,लाजिरवाणा आहे. मुली ,स्त्रिया आजही मासिक पाळी बद्दल उघडपणे बोलत नाही. परिणामतः या लाजिरवाण्यामुळे किंवा उघडणे न बोलल्याने अनेक मुलींना व स्त्रियांना पोट दुखीचा त्रास होऊन त्यांचा मृत्यू देखील झाला आहे.

पाळीदरम्यान मुलीचा जीव जाणे ही अत्यंत दुर्दैवी घटना असून, अनेकदा हे मासिक पाळीच्या वेदनांनी त्रस्त, अज्ञानामुळे किंवा ''सामाजिक लाजिरवाणेपणा'' यांसारख्या कारणांमुळे घडते, जसे की अलीकडेच हैदराबादमध्ये एका विद्यार्थिनीचा शिक्षकांनी केलेल्या अपमानामुळे तणावातून ब्रेन क्लॉट होऊन मृत्यू झाल्याची घटना घडली .

दुसरी एक घटना नुकतीच कर्नाटक राज्यात घडली.

आजही होणार नाहीत. कर्नाटकातील तुमकुरु येथे १९ वर्षांच्या कीर्तनाची मासिक पाळी दरम्यान मृत्यू झाला.वेदना असह्य होत होत्या मात्र याबाबत ती उघडपणे बोलू शकली नाही. मासिक पाळी दरम्यान होणाऱ्या पोटदुखीच्या तीव्र वेदनेने ती त्रस्त होती.

या घटना केवळ एक वैयक्तिक शोकांतिका नाही तर एक मोठा प्रश्न निर्माण करणारा आहे.आपण महिलांचे आरोग्य, विशेषतः मासिक पाळीदरम्यान आरोग्य आणि दीर्घकालीन वेदना, गांभीर्याने घेतो का? ही वेदना अनेकदा सामान्य म्हणून नाकारली जाते, मात्र अनेकदा ही वेदना जीवघेणी ठरू शकते.

पाळीतील तीव्र वेदना गांभीर्याने घेणे महत्त्वाचे आहे, कारण त्या सामान्य वेदना नसून एंडोमेट्रिओसिस, फाइब्रॉइड्स किंवा पेल्विक इंफ्लेमेटरी डिसीज सारख्या गंभीर आजाराचे लक्षण असू शकतात, जे कालांतराने वंध्यत्व किंवा इतर समस्या निर्माण करू शकतात; त्यामुळे वेदना असह्य असल्यास, दैनंदिन जीवनावर परिणाम करत असल्यास, किंवा जास्त रक्तस्त्राव होत असल्यास डॉक्टरांना त्वरित भेटणे आवश्यक आहे, असे अनेक वैद्यकीय तज्ञांनी म्हटलेले आहे.

दरम्यानच्या काळातील वेदना इतक्या तीव्र असतील की दैनंदिन काम थांबवावे लागते.वेदना वेळोवेळी वाढत असतील किंवा त्यासोबत खूप रक्तस्त्राव, मोठे रक्ताचे गोळे येत असतील,मासिक पाळीचा चक्र अनियमित असेल

वेदनेसोबत उलट्या, जुलाब, अशक्तपणा किंवा बेशुद्ध पडणे अशी लक्षणे असतील,तर डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

वेदना सहन करत बसण्याऐवजी डॉक्टरांना भेटून तपासणी करून घ्यावी जीवनशैलीत बदल करावा. योगा, चालणे यांसारखे हलके व्यायाम आणि ताण कमी करणे फायदेशीर ठरू शकते.

आहार आणि जीवनशैलीतील बदल करावा. फायबरयुक्त आहार घ्यावे आणि प्रक्रिया केलेले अन्न टाळावे.

वेदना कमी करण्याचे उपाय: गरम पाण्याचा शेक घेणे किंवा डॉक्टरांच्या सल्ल्याने सारखी औषधे घेणे उपयुक्त ठरू शकते.




# छ. संभाजीनगरमध्ये उद्या 'युवा उद्यमी संवाद'

## राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पू. सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत साधणार संवाद

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पू. सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांचा दिनांक १६ जानेवारी २०२६ (शुक्रवार) व १७ जानेवारी (शनिवार) रोजी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात प्रवास आहे. १६ जानेवारी रोजी छत्रपती संभाजीनगर शहरातील 'युवा संमेलनात' त्यांची उपस्थिती राहील. या संमेलनात आपली संस्कृती, राष्ट्रीय स्वावलंबन आणि इतर महत्त्वाच्या मुद्द्यांवर विचारांची देवाण-घेवाण होणार आहे. हा कार्यक्रम कॉलेजच्या मागील बाजूस मंथन सभागृहात विशेष आमंत्रितांसाठी सकाळी ९.०० ते १२.०० या वेळेत असेल. तर त्याच दिवशी सायंकाळी गंगापूर येथे हिंदू संमेलनात ते



समाजाला उद्बोधन करतील. या संमेलनात हिंदू समाजातील प्रत्येक घटकाने संघटित होऊन धर्मजागृतीसाठी सक्रिय सहभाग घ्यावा, या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. समाजप्रबोधन, संस्कृती रक्षण व राष्ट्रभक्तीचा संदेश देणारे विचार या संमेलनातून मांडले जाणार आहेत. हा कार्यक्रम गंगापूर येथील जिल्हा परिषद शाळेच्या मैदानावर पूजनीय संतांच्या उपस्थितीत सायंकाळी ५.०० वाजता सुरु होईल.

दिनांक १७ जानेवारी रोजी पू. सरसंघचालक छत्रपती संभाजीनगर शहरात संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त (१९२५२०२५) समाज जीवनातील प्रभावशाली व्यक्तींशी विचारांचे, कर्तृत्वाचे व अनुभवांचे थेट संवाद साधण्याच्या उद्देशाने विशेष आमंत्रितांसाठी 'युवा उद्यमी संवाद' कार्यक्रमास उपस्थित राहतील.

हा कार्यक्रम समर्पण कार्यालय, कॉलेज जवळ सकाळी ११.०० ते १२.०० या वेळेत होईल. तसेच सायंकाळी ४.०० वाजता विशेष आमंत्रित व्यक्तींसोबत प्रमुख जन संगोष्ठी मध्ये संवाद साधतील. यामध्ये समाजाचे दिशादर्शक, सन्माननीय व्यक्तित्व उपस्थित असतील. त्यांच्यासोबत पू. सरसंघचालक संवाद व चर्चा करतील.

# नवे राजदूत चमत्कार घडवतील काय?

**ज्योतिर्मय साहित्य**



भारतातील अमेरिकन राजवटांची एक मोठी परंपरा आहे. यापूर्वी प्राध्यापक गॅलरीत तसेच प्रोफेसर मायनी हॉर्न इत्यादींनी भारत अमेरिका संबंध सुधारण्यात महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे, आता भारतात अमेरिकेचे राजदूत म्हणून रुजू झालेले सर्जियो गोर हे या परंपरेचे पालन करून काही नवा चमत्कार घडवतील काय असा प्रश्न उभा केला जात आहे. खरे तर सर्जियो गोर यांचे भारतातील पदार्पण हे त्यांचा पायगुण किती चांगला आहे हे दाखवीत आहेत. त्यांच्या रुजू झाल्यानंतर डोनाल्ड ट्रम्प यांचा भारताकडे पाहण्याचा वक्र दृष्टिकोन सुधारत आहे. खुद्द गोर म्हणतात त्याप्रमाणे भारत अमेरिका दरम्यानची व्यापार बोलणी आता एका नव्या वळणावर उभी आहे. आणि आर्थिक संबंध सुधारण्यासाठी दमदार पावले टाकली जाण्याची शक्यता दिसत आहे. या पार्श्वभूमीवर कोण आहेत सर्जियो गोर, यापूर्वी त्यांनी अमेरिकेतील सार्वजनिक जीवनात कोणती कामगिरी केली आहे. त्यांच्या बौद्धिक चातुर्यामुळे दक्षिण आशिया आणि मध्य आशियात अमेरिकेचे संबंध सुधारण्यात किती मदत होईल, खरोखरच बिघडलेला सत्ता समतोल सुधारण्यात ते यशस्वी होतील काय असे अनेक प्रश्न विचारले जात आहेत.

थोडा पूर्व इतिहास – सर्जियो गोर हे अमेरिकेच्या जॉर्ज वॉशिंग्टन विद्यापीठाचे बीए पदवीधर आहेत. राज्यशास्त्र आणि सामाजिक शास्त्रातील त्यांची गती वाखाणण्यासारखी आहे. शिवाय त्यांनी रिपब्लिकन पक्षात केलेले कार्य सुद्धा प्रगल्भ आणि उबदार असेच आहे. या पूर्वानुभवाचा फायदा त्यांना दक्षिण आणि मध्य आशियात कार्य करताना होणार आहे अमेरिकन राष्ट्राध्यक्षाच्या कार्मीक कार्यालयात त्यांनी काम केल्यामुळे डोनाल्ड ट्रम्प यांच्या कार्यपद्धतीची त्यांना चांगली जाणीव आहे ते मूळचे रशियन असून ताश्कंद येथे त्यांचा जन्म झाला आहे. रशियातील साम्यवादाचा प्रभाव दूर झाल्यानंतर आता तेथील तरुण झपाट्याने अमेरिकन लोकसंस्कृतीमध्ये सहभागी होऊ शकतात. त्याचे सर्जियो गोर हे एक उदाहरण आहे. भारत रशिया संबंध सुधारलेले असल्यामुळे गोर यांच्या या पार्श्वभूमीचा त्यांना भारताची भूमिका समजावून घेण्यासाठी चांगला फायदा होऊ शकतो. एखादा राजदूत विशाल खंडप्राय देशात कार्य करताना किती प्रगल्भपणे आणि जबाबदारीने वागतात त्यावरच त्यांच्या कार्यकर्तृत्वाची किनार अवलंबून असते. नव्या राजदूतांना नवनवीन आव्हानांना सामोरे जावे लागणार आहे, शिवाय त्यांना दक्षिण व मध्य आशियाची अधिकची जबाबदारी असल्यामुळे हे नवे सत्तापद त्यांच्या वाढत्या प्रभुत्वाचे द्योतक आहेच, शिवाय पाकिस्तान अफगाणिस्तान म्यानमार श्रीलंका या देशातील अस्थिर राजकारण समजावून घेऊन त्यांना तेथील परिस्थिती सुद्धा हाताळावी लागणार आहे. ही तारेवरची कसरत गोर महोदय कशाप्रकारे करतात ते आता पहावयाचे आहे.

प्रमुख आव्हाने कोणती

अमेरिकेचे भारतातील नवे राजदूत सर्जियो गोर यांच्यापुढे सध्या प्रमुख आव्हान कोणते असेल तर ते भारत अमेरिका संबंध मजबूत करण्याचे आहे डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर लादलेले टेरिफ कर कसे सुसह्य करता येतील, त्यांना मुरड घालून भारत अमेरिका व्यापार कसा सुधारता येईल हा कळीचा मुद्दा आहे. शिवाय दोन्ही देशातील कृषी उद्योग शिक्षण आरोग्य समाज कल्याण सुरक्षा आणि संरक्षण तसेच दहशतवादाचे उच्चाटन याबाबतीत सकारात्मक वातावरण तयार करण्यासाठी त्यांना नवी दमदार पावले टाकावयाची आहेत. याबाबतीत त्यांची बुद्धिमत्ता चातुर्य आणि कल्पकता या बाबी कसोटीवर उतरणार आहेत पाकिस्तान सारख्या देशाचे खाण्याचे आणि दाखविण्याची दात भिन्न आहेत वर मैत्रीचे नाटक करावयाचे आणि आतून मित्राच्या पोटात खंजीर खुपसावयाचा हे उलटे उपराटे राजकारण यापूर्वी अमेरिकेने अनुभवले आहे. अमेरिकेशी गोडी गुलाबी करत करतच तिच्यावर मोठा दहशतवादी हल्ला ओसामा बिन लादेन यांनी केला होता. तेव्हा बुश कसे चुकले आणि ओबामा याने ती चूक कशी दुरुस्त केली हे सारे लक्षात घेऊन आता ट्रम्प यांच्याकडून त्या चुका पुन्हा होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे सर्जियो गोर यांना दूध पोळले म्हणून ताक फुंकून पिण्याची वेळ आली आहे. त्यांना दक्षिण आणि मध्य आशियातील राजकारण समजावून घेताना सुद्धा अधिक काळजीपूर्वक अधिक समजूतदारपणे पावले टाकावे लागतील.




प्रगल्भ अशी समज


सर्जियो गोर यांची भारतात अमेरिकेचे राजदूत म्हणून सूत्रे घेतल्यानंतर त्यांनी केलेली निवेदने अभ्यासली असता त्यामध्ये त्यांची प्रगल्भ अशी बौद्धिक समज आणि आंतरराष्ट्रीय राजकारणातील आकलन क्षमता यांची जाणीव दिसून येते.

आंतरराष्ट्रीय राजकारणात जुनी समीकरणे बदलत आहेत, नवी प्रमेय मांडली जात आहेत, आणि गेल्या दहा वर्षात भारत आशिया खंडातील एक बलशाली सत्ता म्हणून उदयास आला आहे. भारताचे आर्थिक सामर्थ्य तसेच जागतिक मुक्तव्यापार करा आणि जी २० ब्रिक्स तसेच वाढ ७ इत्यादी शिखर परिषद यातील भारताचा सक्रिय सहभाग पाहता भारताकडून विश्वशांतीच्या संदर्भात अपेक्षा उंचावल्या आहेत इजरायल हमास युद्ध आणि युक्रेन रशिया युद्ध थांबविण्यासाठी सुद्धा भारताचे सक्रिय सहकार्य सर्जियो गोर घेऊ शकतात. व्हेनेझुवेलातील संघर्ष असो की कंबोडिया थायलंड मधील वाद असो, भारताने घेतलेली भूमिका ही शांतता आणि विकासाला नेहमीच पूरक राहिली आहे. त्यामुळे सर्जियो गोर भारताचा हा पवित्रा लक्षात घेऊन अमेरिकन राजकारणाशी त्याला कसे जुळवून घेतील यावरच त्यांची क्षमता अवलंबून असणार आहे. अमेरिकन राजकारणात आणि रिपब्लिकन पक्षात एक भारत विरोधी गट सतत कार्यरत असतो. हा गट भारत विरोधी हवा तापविण्याचा नेहमी प्रयत्न करत असतो. त्यांच्या दबावाला बळी न पडता सर्जियो गोर किती निर्णायक किती वस्तुनिष्ठ भूमिका घेतात यावरच त्यांच्या नव्या कारकिर्दीचा खरा यशापयशाचा आलेख अवलंबून असणार आहे. त्यांनी चीन असो की रशिया असो यांच्या एकतंत्री दबावाला बळी न पडता भारताला समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. भारत आणि अमेरिका ही जगातील दोन महान लोकशाही राष्ट्र आहेत आणि भारताच्या स्वातंत्र्यलढा पासून चीनचे आक्रमण असो की भारतामध्ये कृषी क्रांती असो या सर्व बाबतीत अमेरिकेने भारताला केलेले सहकार्य हे निश्चितच नवे वळण देणारे ठरले होते. आता या सर्व पार्श्वभूमीवर सर्जियो गोर कोणकोणते पवित्रे घेतात कोणती समीकरणे टाकतात यावर भारत अमेरिका संबंधांचा सुवर्णकाळ अवलंबून असेल.

समारोप – या सर्व चर्चेवरून हे स्पष्ट होते की अमेरिकेचे भारतातील नवे राजदूत सर्जियो गोर यांच्याकडून भारतीयांच्या अपेक्षा उंचावल्या आहेत त्यांनी आता तत्काळ भारत अमेरिका व्यापार कराराला अंतिम रूप देण्यासाठी मदत करावी. हा करार एकतर्फी नव्हे तर दोघांच्याही हिताचा कसा होईल हे पहावे. दुसरे म्हणजे बदलत्या जगात कृषी औद्योगिक प्रगती असो की शिक्षण संशोधन तसेच माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता हे क्षेत्र असो, तसेच अंतराळ संशोधन आणि सागरी संशोधन या सर्व क्षेत्रात भारताच्या उजळ कामगिरीचे महत्त्व लक्षात घेऊन अमेरिकेने भारताबरोबर असलेले पूर्व संबंध अधिक यश शिखरावर नेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. या दृष्टीने विचार करता सर्जियो गोर यांचे इंद्रप्रस्थ नगरीतील आगमन हे नव्या सुवर्णपरंपरेची मळलेली वाट अधिक सुलभ करण्यात किती सकारात्मक राहते यावरच हा संबंधांचा आलेखबिंदू अवलंबून असेल. त्यामुळे नजीकच्या भविष्यकाळात भारत अमेरिका मैत्रीचा अमृत कलश अधिक मधुर कसा होईल हे गोर महोदयांच्या प्राचार्य चातुर्य आणि माधुर्य यावर अवलंबून असणार आहे. या कसोटीवर ते कसे उतरतात यावरच त्यांच्या भावी कर्तुत्वाचा मंगल कलश अधिक प्रकाशमान होऊ शकेल.

या पुढील काळात त्यांच्या कार्यकर्तृत्वाची कसोटी ही इतिहासाची पाने बदलण्यासाठी पूरक आणि सहाय्यभूत ठरेल काय हाच खरा प्रश्न आहे. ***



# जात्यावरच्या ओव्या......


गायी तुह्या पायी
दह्यादुधाची चंगळ
लेक मारतो बैढका
पहिलवान लै वंगळ ||४५०||

सार तुडवून रान
गायी परतुन आल्या
पान्हा पाजला वासरा
अन् मग पाणी पिल्या ||४५१||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# संक्रांत, मुले आणि केशव काका

ज्योतिर्मय साहित्य




संक्रांतीचा दिवस आणि संध्याकाळची वेळ आहे. आपल्या घरी केशव काका एक पुस्तक वाचत बसले आहेत. केशव काका गोरे, उंच, चेहऱ्यावर तेज आणि भारदस्त आवाज लाभलेले असे बहुआयामी व्यक्तिमत्व. केशव काका आजूबाजूच्या परिसरात काका म्हणूनच प्रसिद्ध आहेत आणि बालगोपाळांशी तर त्यांची नेहमीच गट्टी जमते. आताही काकांकडे चिंगी, वैशाली आणि सुहास ही तीन मुले आलेली आहेत. ही तिघेही मुलं साधारणपणे दहा ते बारा वर्षांची आहेत. मुले मोठमोठ्याने हसत आणि आरडाओरडा करत काकांच्या घरात प्रवेश करतात.




काका – अरे सुहास, चिंगी, वैशाली जरा हळू. आणि काय झालं ते जरा मलाही कळू देत की.

चिंगी – काका, अहो आज आम्ही तिळगुळ द्यायला निघालो ना, तर या सुहासने माझा तिळगुळ खाली सांडला. मी त्याला म्हटलं की माझा तिळगुळ सांडू नको, माझ्याशी भांडू नको. तर बघा ना हसतोय माझ्यावर आणि म्हणतो की चल काही नाही होत तिळगुळ सांडल्यानं .

सुहास – काका, तुम्हीच सांगा काय होतं असं थोडा तिळगुळ सांडला तर ? पुष्कळ तर आहे तिच्याकडे.

काका – अरे सुहास, चिंगी म्हणते ते खरं आहे. तिळगुळ सांडायचा नसतो. त्याच्यामागे प्रेम असतं, चांगल्या भावना असतात. तुम्ही तिळगुळ सांडला म्हणजे एक प्रकारे त्या भावनांचा अनादर नाही का होत ?


वैशाली – अगदी बरोबर आहे काका तुमचं.


सुहास – काका, संक्रांत म्हणजे असा काय विशेष दिवस असतो ? मस्त सुटीचा दिवस असतो. तिळगुळ वाटायचं. गुळाची पोळी वगैरे खायची आणि मजा करायची. मला तर एवढंच माहित आहे.

वैशाली – काका, मी बाबांना विचारलं की संक्रांत म्हणजे काय तर मला म्हणाले, जा बाहेर खेळ जरा. माझं डोकं नको खाऊस. त्यांना त्यांचं काम आणि मोबाईलमधून डोकं बाहेर काढायला सवडच नाहीये.

चिंगी – काका, आम्हाला काही प्रश्न पडलेत. तुम्ही सांगाल का त्यांची उत्तरं ?

काका – अरे, नक्कीच. मग मी आहे कशासाठी ? तुम्हाला जे जे प्रश्न पडले असतील ते मला बिनधास्त विचारत जा, काय ? (क्रमशः)



दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# विमलब्रम्हनिरूपण

ज्योतिर्मय साहित्य

नमस्कार

परमार्थ म्हणजे काय.

ब्रम्हज्ञानी लोक खात्रीपूर्वक सांगतात की, परमात्मवस्तु अपरंपार आहे. तिच्या छोट्याशा भागावर पण विश्वाचा देखावा दिसतो. मुळातच परमात्मस्वरूप असलेले विश्व आपल्या इंद्रियांना पदार्थ रूप दिसते. वास्तविक ते तसे नाही. कारण इंद्रियांना खरेखोटे समजत नाही. इंद्रियांना दिसणारे पदार्थ हे ब्रम्ह आतबाहेर व्यापून आहेत. पण विश्वाच्या बाहेर ते आणखी किती आहे याचा पत्ता कोणालाही लागला नाही. ब्रम्ह अतिसूक्ष्म आहे. ते अतींद्रिय आहे सदोदित आपल्या जवळ आहे. ते संपूर्ण खरे असल्याने त्याच्या मानाने आपले हे विश्व झोपेतल्या स्वप्नात असल्या प्रमाणे वाटते. आपण देहबुद्धीत आहोत तोपर्यंत ते खरे वाटते व जडत्वाने अनुभवायला मिळते. पण ज्ञानाची तळमळ लागल्यावर तेच परमात्मस्वरूप अनुभवायला येते.तेव्हा ज्ञानाची खरी ओळख साधणे म्हणजे ''परमार्थ''होय.


ब्रम्ह स्वरूप विशाल आहे. सर्व विश्वाला सर्व बाजूंनी व्यापून आहे. जीवाला आतबाहेर चिकटून आहे. पण ते आपल्या जवळ आहे याची जाणीव आपल्याला नसते.

ब्रम्ह कसे आहे

ते आकाशासारखे पोकळ आहे रूप नसलेले व बेहद्द विशाल आहे. एकवीस स्वर्ग, सात पाताळे मिळून एक ब्रम्हगोल होतो. अशा विशालकाय ब्रम्हाला त्या निर्मल ब्रम्हाने व्यापले आहे. म्हणजेच जळी स्थळी काष्टी, पाषाणी ब्रम्ह व्यापून राहिले आहे. जन्मलेल्या बाळापासून ते मरेपर्यंत सर्वाना ब्रम्हाची गरज आहे. आकाशाच्या पुढे कोणी जात राहिला तर तो जिकडे जाईल तिकडे आकाश त्याच्या पुढे जात राहील म्हणून ब्रम्हाला कधीही कोठेही शेवट नाही.

आपल्याला सर्वत्र जर ब्रम्हाचा भास होतो. ज्ञानी माणसाला जे ब्रम्ह स्वरूप दिसते ते अज्ञानी माणसाला दृुष्यरूपात दिसते . सर्व माणसे ब्रम्हामध्येच जगतात.फक्त त्याची जाणीव नसते. एक साधं उदा, देते आकाशात ढग दिसतात आपण पहातो ते स्वच्छ निरभ्र आकाश असते पण ढगाच्या येण्याने ते काळे होते हा काळेपणा वरवरचा असतो एकदा का पर्जन्याची बरसाद झाली की आकाश पुन्हा आपल्याला स्वच्छ निळेशार दिसते. (क्रमशः)

# परमेश्वराची खरी पूजा



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

देहाभिमान नाहीसा झाला म्हणजे काळजीचे कारण उरत नाही. ' मी साधन करतो ' असा अभिमान देहाभिमानामुळे उत्पन्न होतो. हा साधनाभिमानही घातुक असतो. तेव्हा, जे काही होते ते परमेश्वराच्या सत्तेने होते असे मानीत जावे. आपले हित कशात असते ते त्यालाच उत्तम कळते, आणि तो सर्व तुमच्या बऱ्याकरिताच करीत असतो. तेव्हा कसलीही काळजी करू नये. त्याच्यावर विश्वास टाकून आनंदात असावे. चित्तवृत्ती परमेश्वराकडे लावावी. तेथून ती विषयाकडे जाऊ लागली म्हणजे संधी साधावी; म्हणजे त्यावर लक्ष असावे. मन विषयाकार होऊ लागले म्हणजे माझे स्मरण करावे. बऱ्याच वेळाने आठवण झाली तरी माझे स्मरण करावे, म्हणजे पुढे पुढे लवकर आठवण होऊ लागेल. ज्याचे मन पूजेत असते त्याची खरी पूजा होते. सर्वांभूतीं भगवद्भाव, आणि कोणाचे मन न दुखविणे, ही पूजा खरी होय. पूजेला बाह्योपचाराची गरज नसते. मन मात्र अर्पण होणे जरूर आहे. पूजेत भाव असणे जरूर आहे.

भक्ती आणि वैराग्य यांच्यामध्ये तसा फरक नाही. परमेश्वराची आवड म्हणजे भक्ती, आणि विषयाची अनासक्ती म्हणजे वैराग्य. रामराय वनवासात जायला निघाले तेव्हा त्यांनी सीतामाईला बरोबर न येण्याविषयी सांगितले. त्या वेळी तिने उत्तर दिले की, ' रामा ! तुझ्याबरोबर असेन तर मला सर्व कष्ट सुखमय आहेत; आणि तुझ्याशिवाय असेन तर सर्व सुखोपभोग हे मला कष्टमयच आहेत. ' सीता ही रामाची मोठी भक्त होती, आणि म्हणून तिची अशी अवस्था होती. तिला परिस्थितीची जाणीव नव्हती. पण आपली गोष्ट अशी नाही. आपण एकीकडे परिस्थितीवर अवलंबून आहोत आणि दुसरीकडे आपल्याला भगवंत पाहिजे, म्हणून आपण मध्यम मार्ग धरावा; तो हा की, आपण म्हणावे, ' रामा, माझी परिस्थिती तुझ्या इच्छेवर अवलंबून आहे. ' असे आपण मन:पूर्वक म्हटले की परिस्थिती बदलली तरी आपला आनंद टिकेल.

' माझ्या देवाला हे आवडेल का ? ' अशा भावनेने जगात वागणे हाच सगुणोपासनेचा हेतू आहे. जसजशी आपण सगुणाची उपाधी वाढवतो तसतशी आपली इतर उपाधी कमी कमी होत जाते. सगुणाच्या उपासनेला आज आपण कल्पनेने प्रारंभ करू, मागून निश्चयात्मकता आपोआप येईल. चैतन्य सर्व ठिकाणी भरलेले आहे; ते कुठेही प्रकट होऊ शकेल. त्याला प्रकट करणे हे आपल्या भावनेवर अवलंबून आहे. ज्याची भावना खरी शुद्ध, म्हणजे नि:संशय असते, त्याला दगडाची मूर्तीदेखील देव बनते. भावना मात्र शंभर नंबरी पाहिजे; त्यामध्ये भेसळ उपयोगाची नाही.

उपाधी वासना नाहीशा करण्यासाठीच नाम घ्यायचे असते.



श्री संत ज्ञानेश्वर
अभंग व अर्थ

*अभंग १७*

*निज ब्रह्मा ब्रह्म तो ।*
*ब्रह्मादिकां वंद्य तो गे बाई ॥१॥*
*अचिंतचिंतन तो ।*
*सारासार गुह्य तो गे बाई ॥ध्रु०॥*
*बाप रखुमादेविवरु विठ्ठलु तो ।*
*जनीं वनीं कृपाळु तो गे बाई ॥२॥*

*अर्थ:-*

*हे जीवरुप सखी, तो त्या भगवान ब्रह्मयाचा ब्रह्म आहे. व ब्रह्मादिकांना तोच वंदनिय आहे. तो अचिंतनाचे चिंतन तोच आहे. तो सारासार विचार करुन निघालेले गौप्य (गीतेत गौप्याचे गुप्तधन गीतेला म्हंटले आहे) आहे. तो सर्व चराचरावर कृपा करणारे रखुमाईचा पती व माझे पिता आहेत. असे माऊली सांगतात.*

*अभंग १८*

*सारंगधरु तो ।*
*चक्रा आधारु हरि तो गे बाई ॥१॥*
*सुलभा सुलभ तो ।*
*आटकु नटके तो गे बाई ॥ध्रु०॥*
*रखुमादेविवरु तो ।*
*द्वैताद्वैतातीत तो गे बाई ॥२॥*

*अर्थ:-*

*हातात सुदर्शन चक्र धरणारा व सारंग नावाचे धनुष्य घेणारा, माझे जीवरुपी सखी तोच आहे. तो स्वरुपप्राप्तीला प्रतिबंध न करणारा सहज प्राप्त होणारा आहे. तो द्वैताद्वैता पलिकडील असलेला रखुमाईचा पती आहे असे माऊली सांगतात.*




# तूप खा... निरोगी आयुष्यजगा...

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

सात धातूंमध्ये मज्जा हा धातू सर्वात श्रेष्ठ धातू होय. शरिराच्या ठिकठिकाणाच्या कार्यास तुपाची मदत मोठी होते, आयुर्वेदाप्रमाणे तूप हे आयुष्यवर्धक व मधूर रसाच्या पदार्थात श्रेष्ठ आहे, शरिराला तुपामुळे स्थैर्य मिळते, बुद्धि, धारणा शक्ति, स्मरणशक्ति वाढवणे याकरता तूप माफक प्रमाणात रोज घ्यावे.

घ्रुत हे शित गुणांचे असून वात व पित्त विकारात काम करते, अरूची, भूक न लागणे, अग्निमांद्य, या विकारात अग्निवर्धन होते, शीतपित्त, व गांधी उठणे या विकारात, तुपात कालवून मिरेपुड लावली तर अंगाची खाज कमी होते,

आम्लपित्तात, नियमाने सकाळी व संद्याकाळी पंधरा ग्रॅम तूप घ्यावे, स्रियांच्या प्रदर विकारात गुणकारी आहे, क्रूश व्यक्तिने कंबरदुखी, गुडघेदुखी, सांधेदुखी यावर थोडे तुप गरम पाण्याबरोबर घ्यावे,

ज्यांचा कोठा रुक्ष आहे, बद्धकोष्ठ आहे, त्यांनी रोज रात्री एक कप गरम दुधासोबत एक चमचा तूप घ्यावे.

कान सतत वाहणे, कानात आवाज येणे, कान कोरडे पडणे, तसेच डोळे रूक्ष होणे, डोळ्यांचा वाढता नंबर, डोळे लाल होणे, या विकारात सकाळी, वीस ग्रॅम तूप खावे.

उष्णतेने केस गळत असल्यास, केसात खवडे, चाई, फोड होत असल्यास, नियमित तूप खावे, कुरूप या विकारात कुरूप कापण्यापेक्षा, शतघौत तुप तिथे घासावे, बरे होतात. शांत झोपेकरता, तळपायाला, कानशिल, कपाळपट्टि, यांना तूप चांगले जिरवावे.

वात, गुल्म, पोटात फिरणारा वायू गोळा याकरता जेवणाच्या सुरुवातीला तूप चमचाभर खाउन जेवण संपतांना पुन्हा चमचाभर खावे.

शरिरातील कोणतिही जखम भरून येण्यास व आतड्यातील व्रण भरण्यास तुपाचे सेवन गुणकारी आहे..

क्रुश व्यक्तिच्या छातीत दुखणे, क्षयरोग, थुंकीतून रक्त पडणे, कडकी, बारीक हाडे ताप या विकारात नेमाने तुप खावे, बल मिळते. सततची डोकेदुखी, असल्यास

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

नाकपुडीत दोन थेंब तुपाचे टाकावे,

तोंड आल्यास, अल्सर झाल्यास जिभेला तुप चोळावे. त तोंडात तुप धरावे,

त्वचा विकारात , खाज व आग, थांबवण्याकरता, विशेषतः सोरायसिस मद्ये तुप खाणे लाभदायी आहे,

समस्त विषविकारात पोटात घेण्यासाठी तुपासारखा उपाय नाही, विषाच्या दहा गुणाविरूद्ध लढा देण्यास तुपाचे दहा गुण आहेत, चुकिच्या औषधांचे परिणाम डोळ्यावर, त्वचेवर, केसांवर, किडनीवर, झाल्यास , सकाळी तूप घ्यावे.

फिटस् येणे, आकडी, विस्मरण, उन्माद, या वातविकारात, पोटात तूप घ्यावे, तळहात, पाय, कानशिले, यांना तूप घासावे, लकवा, तोंडावरून वारे जाणे, तोंड वाकडे होणे, या विकारात, नाकात दोन थेंब तुप टाकावे, डोळ्यात टाकावे.

मूळव्याधीत गरम दूधात तुप घालून प्यावे, वारंवार गर्भपात होत असल्यास तूपाचे नियमित सेवन केल्यास गर्भाशय बलवान होते, कॅंसर व्याधित केमोथेरपी, रेडिएशन, यांचे दुष्परिणाम टाळण्याकरता तूपाचे सेवन करावे. शुद्ध तुपाने चेहऱ्यावर मालिश केल्यास चमकतो, मुलायम राहतो,

डाळ शिजतांना तूप टाकल्यास गॅस होत नाही.

तुपामध्ये विटामिन ए. डी. व कॅलशिअम, फॉस्फोरस, मिनरल्स, पोटॅशिअम, असे अनेक पोषक तत्वे असतात,

तेव्हा, आपल्या आहारात नक्कीच तूप कायम असावे. देशी गाईचे तूप अतिउत्तम.



लघु बोधकथा

*♦कोल्हा♦*

*एका कोल्ह्याचे शेपूट लोखंडी सापळ्यात सापडले असता ते तोडून तो पळाला. प्रथम त्याला आनंद झाला की प्राणांवरचे शेपटीवर निभावले. पण जेव्हा तो आपल्या मंडळीत जाऊ लागला, तेव्हा त्याला आपल्या लांडेपणाचे फार वाईट वाटून तो मनात म्हणाला, 'मी मेलो असतो तर बरं झालं असतं. पण ही अप्रतिष्ठा वाईट, पण जे झाले त्याला उपाय नाही. आता हेच कसं शोभवून नेलं म्हणजे झालं ! यासाठी काय बरं युक्ती करावी ?' याचा तो विचार करीत असता त्याला एक युक्ती सुचली ती अशी की आपण सर्व कोल्हे मंडळींना एकत्र जमवून सांगावे की, 'माझी शेपटी मी तोडून टाकून ही भूषणाची नवी पद्धत काढली आहे. ही चांगली आहे अन् तुम्हीसुद्धा अवश्य करावं.' मग त्याने सगळ्या कोल्ह्यांना आपल्या घरी बोलावले व आपल्या युक्तीप्रमाणे त्यांच्यापुढे भाषण दिले. तो म्हणाला, 'अहो, या शेपटीपासून काहीच फायदा नाही. आपल्याला शेपटी म्हणजे ओझंच. शेपटी तोडून टाकल्यानं एक प्रकारचं सौंदर्य येऊन शिवाय पळण्यातली अडचण दूर होते. मी ह्या गोष्टीचा अनुभव घेतला आहे नि शेपटी तोडल्यापासून सुखी आहे. हे सुख तुम्हाला प्राप्त व्हावं असं मला वाटलं.' इतके बोलून आपले कितीजण ऐकतात हे पाहण्यासाठी तो सगळ्यांकडे पाहू लागला. इतक्यात एक म्हातारा कोल्हा त्याची लबाडी ओळखून मान वाकडी करून म्हणाला, 'अहो, पंडित महाराज, आपली हुषारी पुरे. शेपटी काढल्यामुळे तुमचं कल्याण झालं असेल, यात शंका नाही. अन् आमच्यावर जेव्हा वेळ येईल तेव्हा आम्हीही आपली शेपटी कापून टाकू. तोपर्यंत तुम्ही आम्हाला आग्रह करू नये हेच बरं.'*

*तात्पर्य - आपली अप्रतिष्ठा होऊ नये म्हणून आपले दोष हे नसून गुण आहेत असे बरेचजण सांगतात पण शहाणे लोक त्यांच्या बोलण्यावर विश्वास ठेवत नाहीत.*

# सौ वर्षा भाऊराव कोसराबे यांचा निवृत्ती सोहळा थाटात संपन्न

**ज्योतिर्मय साहित्य**

नगर परिषद टिळक प्राथमिक शाळा सिंदी रेल्वे येथे कार्यरत असलेल्या प्राथमिक शाळेतील जेष्ठ सहाय्यक शिक्षिका सौ. वर्षा भाऊराव कोसराबे यांचा सेवापूर्ती सत्कार सोहळा थाटात नुकताच संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगरपरिषद सिंदी चे माजी लेखापाल श्री मोहन अंभोरे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून नगरपरिषदेचे नवनिर्वाचित नगर सेवक श्री आशिष भाऊ देवतळे, श्री सुनील भाऊ बोंबले प्रामुख्याने उपस्थित होते. तसेच याप्रसंगी ज्येष्ठ सेवानिवृत्त शिक्षक श्री रामकृष्ण हांडे व दिवाकर गोमासे, श्री विलास इटनकर, श्री भाऊराव बोरकर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक श्री. प्रफुल्ल कांबळे यांनी केले.याप्रसंगी वर्षा भाऊरावजी कोसराबे यांचा सहपत्निक सत्कार शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह व भेट वस्तू देऊन करण्यात आला. सत्कारमूर्ती सौ वर्षा कोसराबे यांनी



आपले मनोगत व्यक्त केले.तेव्हा त्यांचे डोळे पाणावले होते. लग्नाच्या दिवशी माहेर सोडताना जसं मन भरून येतं, तसंच प्रदीर्घ सेवेनंतर निवृत्त होताना माझ्या मनाची अवस्था झाली आहे अशी हृदयस्पर्शी उद्गार सेवानिवृत्त शिक्षिका वर्षा कोसराबे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

या प्रसंगी वक्त्यांनी सौ वर्षा कोसराबे यांच्या शिस्तप्रिय, कर्तव्यनिष्ठ, व विद्यार्थीप्रिय कार्याचा गौरव केला.शिक्षकाची कर्तव्यनिष्ठा अत्यंत महत्त्वाची असते कारण ती विद्यार्थ्यांची जडणघडण, त्यांचे भविष्य आणि समाजाच्या प्रगतीचा पाया घालते; कर्तव्यनिष्ठ शिक्षक ज्ञानासोबत नैतिक मूल्ये शिकवून विद्यार्थ्यांना सक्षम करतात आणि त्यांच्यामध्ये सकारात्मक बदल घडवून आणतात, ज्यामुळे एक सुसंस्कारी आणि जबाबदार पिढी तयार होते,असे गौरवपूर्ण उद्गार उपस्थितांनी केला. प्रमुख उपस्थितांमध्ये पत्रकार श्री मोहन सुरकार प्रामुख्याने उपस्थित होते. सत्कार प्रसंगी त्यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे आयोजन टिळक प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक श्री प्रफ ुल्ल कांबळे, श्री ईश्वर जाधव श्री संजय भाऊ वांदिले, यांनी केले . कार्यक्रम यशस्वी करण्यात श्रीमती शोभाताई बनसोड तसेच अंगणवाडी शिक्षिका सोनाली साखरे व वेणुताई कोरडे, प्रतिभा सातघरे यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे संचालन श्री अहमद पठाण तर आभार प्रदर्शन श्री भगवंत पवार सर यांनी केले.






# भारत विकास परिषद पंढरपूरच्या वतीने मोफत दिव्यांग शिबीर

**ज्योतिर्मय साहित्य**

पंढरपूर : भारत विकास परिषद पंढरपूर व दिव्यांग केंद्र पुणे यांच्या वतीने शनिवार दि. १४ फेब्रुवारी २०२६ रोजी मोफत दिव्यांग शिबीर आयोजित करण्यात येणार आहे. त्यासाठीची आयोजन बैठक ११ जानेवारी २०२६ रोजी करण्यात आली. या बैठकीसाठी व या शिबिराचे मार्गदर्शन करण्यासाठी दिव्यांग केंद्र पुणे चे प्रमुख श्री. विनयजी खटावकर हे उपस्थित होते.

शनिवार दि. १४ फेब्रुवारी २०२६ रोजी घेण्यात येणार ''दिव्यांग शिबीर'' हे मोजमाप शिबीर आहे. या शिबिरात साधारणपणे मॉड्युलर २५० पाय व ५० हात-कॅलिपर यांचे मोजमाप घेण्यात येणार आहे. या एकाची किंमत साधारणपणे ५० हजार रु. ते ७० हजार रु.असून आपल्या शिबिरामार्फत आपण योग्य व्यक्तींना हे मोफत बसवणार आहोत. या मोजमाप शिबिरा नंतर साधारण महिनाभरात प्रत्यक्ष पाय, हात, कॅलिपर वाटप व बसविण्याचे शिबिरही आपण घेणार आहोत. त्यामुळे हात-पाय तुटलेल्या-निकामी झालेल्या जास्तीत जास्त गरजू व्यक्तींनी प्रथम नोंदणी करूनच या शिबिरात सहभाग घेऊन याचा लाभ घ्यावा असे आवाहन दिव्यांग केंद्र, पुणे चे श्री. विनयजी खटावकर व भारत विकास परिषद शाखा पंढरपूर यांच्यावतीने कालच्या बैठकीत करण्यात आले.सौ, सुजाता विनय खटावकर व भाविप चे बहुसंख्य सदस्य उपस्थित होते.

(महत्वाची सूचना - पूर्व नोंदणी केल्याशिवाय शिबिरात सहभागी होता येणार नाही. पूर्व नोंदणी व माहितीसाठी पुढील दिलेल्या अधिकृत नोंदणी धारकांशीच संपर्क साधावा -) नोंदणी संपर्क - श्री. रत्नाकर देशपांडे ९८५०५८७२३२ सौ. भाग्यश्री लिहिणे ९३७१०६४१७९




# आचार, विचार वृतीचे संक्रमण हीच खरी मकर संक्रात - सौ.श्रेया तापडिया

**ज्योतिर्मय साहित्य**

बाणेर, पुणे - १४/१/२०२६ बुधवार रोजी मकर संक्रांतीनिमित्त श्री.भगवती मंदिराचे सभागृह बाणेर येथे स्व.भगिरथ जी तापडिया ट्रस्ट तर्फे व भगवती सेवा आश्रम यांच्या संयुक्त विद्यमाने सेवा वस्तीतील १०० होतकरू शालेय मुलांना शालेय उपयोगी साहित्य वाटप करण्यात आले.

त्या प्रसंगी प्राणिक हिलींग मेडिटेशन ट्रेनर कोच सौ.श्रेया तापडिया यांच्या शुभास्ते झाले.

''विद्यार्थ्यांनी अंगी स्वयंशिस्त, अभ्यासात नियमितता, जिज्ञासू वृत्ती व नवनविन तंत्रज्ञान आत्मसात केले तरच भावि जीवनात यशस्वी दिशा मिळेल व आचार, विचार व कृतीचे संक्रमण हिच खरी मकरसंक्रांत'' असे उद्गार सौ. श्रेयाजी तापडिया यांनी प्रसंगी व्यक्त केले.अतिथींचे स्वागत सौ.शारदा भाभीजी राठी यांनी केले. याप्रसंगी सर्वश्री हरित पूणेचे संकल्पक ओमजी चांडक, विद्यापिठ स्व.से.संघाचे किशोर वैद्य, अरविंद आप्पा वळसंगकर, संगणक तंत्रज्ञ विकास जोशी, संगणक अध्यापक श्रीरंग कूर्हे, चि.अंश व अनोकी तापडिया, सेवा वस्तीतील विद्यार्थी व विद्यार्थीनी उपस्थित होते.

उपस्थितांचे आभार प्रदर्शन गिरीधरभाई राठी तर सुत्रसंचलन व निवेदन डॉ.श्याम कुलकर्णी यांनी केले.









# तिरुपती बालाजी

**ज्योतिर्मय साहित्य**

दर्शनाचा क्रम- तिरुपती व तिरूमला येथे असंख्य मंदिरे आहेत, पण एका विशिष्ट क्रमाने येथील दर्शन घ्यावे अशी मान्यता आहे.

आधी जुने बालाजी दर्शन. मग पद्मावती देवी तिरुचाणुर येथील मंदिराचे दर्शन. यानंतर गोविंदराज स्वामी यांचे तिरुपती येथील मंदिराचे दर्शन. त्यानंतर तिरुमला येथील वराह स्वामी यांचे दर्शन आणि मग शेवटी भगवान व्यंकटेश्वर बालाजी यांचे तिरुमला वरील दर्शन असा क्रम पाळावा अशी मान्यता आहे.

तिरुमला येथिल विविध उत्सव

१) ब्रम्होत्सव

सप्टेंबर ऑक्टोबर या काळात हा सर्वात मोठा उत्सव साजरा होतो हा नऊ दिवस चालतो ब्रह्मदेवाने स्वतः श्रीनिवास यांचे साठी हा उत्सव सुरू केला म्हणून याला ब्रह्मोत्सव म्हणतात दररोज वेगवेगळ्या वाहनांवर श्री बालाजींची मिरवणूक असते ध्वज वाहन, हंस, सिंह, गज, गरुड, अश्वरथ अशी वाहने असतात. गरुड सेवा ही पाचव्या दिवशी रात्री सर्वात पवित्र मानली जाते. शेवटच्या दिवशी रथोत्सव चक्र स्नान असते. अशी मान्यता आहे की, हा सोहळा पाहण्यासाठी पृथ्वीवर प्रत्यक्ष देवता अवतरीत होतात.

२) वैकुंठ एकादशी

डिसेंबर जानेवारी या काळात हा उत्सव येतो. ही मोक्षदायी एकादशी असते. याची मान्यता अशी आहे की या दिवशी वैकुंठ द्वार म्हणजेच उत्तर द्वार उघडले जाते. या दिवशी दर्शन घेतल्यास मोक्ष प्राप्ती होते अशी श्रद्धा आहे.

३) रथ सप्तमी (माघ शुद्ध सप्तमी

जानेवारी फेब्रुवारी मध्ये येणार हा उत्सव सूर्य देवांनी श्रीनिवासांची पूजा केल्याचा दिवस म्हणून साजरा होतो. हा एक दिवसात सात दिवसाच्या प्रमाणे उत्सव साजरा केला जातो. या एकाच दिवशी पहाटेपासून संध्याकाळपर्यंत अखंड मिरवणूक निघते. आणि भगवंताची सात वाहनावरून वाजत गाजत व भजनाच्या घोषात मिरवणूक काढली जाते.

४) पवित्रोत्सव

ऑगस्ट सप्टेंबर या महिन्यात हा तीन दिवस उत्सव असतो. वर्षभरातील पूजा अर्चनेत झालेल्या सूक्ष्म दोष यांचे शुद्धीकरण देवाला पवित्र रेशमी धागा अर्पण करून केल्या जातो.

५) तेपोत्सव (तरंगोत्सव)

मार्च महिन्यात स्वामी पुष्करणी स्थळाजवळ जलमंडपात भगवंताच्या विग्रहाचा नौका विहार करण्यात येतो.हा शांत सौम्य स्वरूपातील उत्सव असतो. वेदमंत्र घोषांच्या नादात भगवंताचा हा जलविहार विलोभनीय असतो. भक्तांना अत्यंत भावनिक अनुभूती यातून मिळते.

तिरुमला येथिल अन्य दर्शनीय स्थळे

१ वराह स्वामी मंदिर (हिरण्याक्ष या राक्षसाच्या वधानंतर भगवंतांनी वराह रुपात इथेच विश्राम केला.) २) शिला तोरणम काही करोड वर्षांपूर्वी नैसर्गिकरित्या तयार झालेली पाषाणाची ही कमानी सारखी रचना आहे या कमानीतूनच वैकुंठातुन भगवंत तिरूमलावर अवतरीत झाले अशी श्रद्धा आहे. ३) आकाश गंगा ब्रह्मदेवांनी स्वर्गातून गंगेला या स्थानी अवतरविले. ४) पाप विनाशनम


५) श्रीनिवास पदचिन्ह


तिरुपती पासून जवळच कालहस्ती नावाचे एक प्रसिद्ध शिवमंदिर आहे ते तिरुपतीहून २५ किलोमीटर दूर आहे.

याशिवाय तिरुपतीहून ११० किलोमीटर अंतरावर वेल्लोर येथे श्री महालक्ष्मी सुवर्ण मंदिर आहे याही मंदिरास भक्त भेट देतात.

भगवान श्री वेंकटेश्वर बालाजी महाराज यांच्या चरणावर विनम्रतेने अभिवादन करून ही मानस यात्रा इथे संपवूयात.

गोविंदा गोविंदा व्यंकटरमणा गोविंदा!



# त्याग आणि बलिदानाचे मूर्तिमंत रूप श्री गुरु तेग बहादूर साहिब जी

ज्योतिर्मय साहित्य

श्री. गुरु तेग बहादूरजी हे शीख समुदायाचे गुरु होते, ज्यांची शहादत केवळ एका धर्म किंवा समुदायापुरती मर्यादित नसून, संपूर्ण मानवतेसाठी त्याग, धैर्य आणि धार्मिक स्वातंत्र्याचे प्रतीक आहे. जेव्हा एका आध्यात्मिक गुरूंनी अन्याय, अत्याचार आणि धार्मिक दडपशाहीसमोर झुकण्याऐवजी आपले शीश अर्पण केले; मात्र आपल्या तत्त्वांशी कोणतीही तडजोड केली नाही. त्यामुळे त्यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त आपल्याला त्या ऐतिहासिक क्षणाची आठवण होणे साहजिकच आहे. नांदेड येथे होत असलेल्या २४ व २५ जानेवारी २०२६ विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.



श्री. गुरु तेग बहादूर साहिबजी केवळ शीख समुदायातीलच नव्हे, तर भारतीय उपखंडाच्या सांस्कृतिक व आध्यात्मिक इतिहासातील एक महान विभूती आहेत. त्यांचे जीवन धैर्य, त्याग, करुणा आणि धार्मिक स्वातंत्र्याच्या सर्वोच्च आदर्शांचे प्रतीक आहेत. त्यांचा जन्म इसवी सन १ एप्रिल १६२१ रोजी अमृतसर येथे झाला. ते सहावे शीख गुरु, गुरु हरगोबिंद साहिबजी यांचे धाकटे पुत्र होते. बालपणापासूनच त्यांचा स्वभाव गंभीर, शांत आणि आत्मचिंतनशील होता. इतर मुले खेळात रमलेली असताना गुरु तेग बहादूर साहिबजी एकांतात बसून ईश्वरचिंतन व साधनेत आनंद अनुभवत असत. त्यामुळेच पुढे त्यांचे जीवन बाह्य वैभवापेक्षा अंतःशक्ती आणि नैतिक दृढतेचे उदाहरण ठरले.

श्री गुरु तेग बहादूर साहिबजींनी बालपणी शस्त्र व शास्त्र या दोन्हींचे शिक्षण घेतले. युद्धकौशल्य, घोडेस्वारी आणि तलवारबाजी यात त्यांनी प्रावीण्य मिळवले; मात्र कधीही हिंसा किंवा सत्तेच्या लालसेकडे त्यांचे मन वळले नाही. धर्म व मानवतेच्या रक्षणासाठीच शस्त्रांचा उपयोग अर्थपूर्ण असतो, हे ते जाणून होते. तरुणपणी त्यांनी दीर्घकाळ ध्यान व तपस्येचे जीवन स्वीकारले. त्यांच्या या वैराग्य व त्यागामुळेच त्यांना 'त्याग मल' असेही म्हटले गेले. हा त्याग संसारापासून पलायन नव्हता, तर अन्यायापुढे कधीही न झुकणारी आत्मशक्ती निर्माण करण्याचा मार्ग होता.

इसवी सन १६६४ मध्ये श्री गुरु तेग बहादूर साहिबजी शिखांचे नववे गुरु झाले. त्या काळात भारतातील सामाजिक व धार्मिक वातावरण अत्यंत तणावपूर्ण होते. तत्कालिन शासकाच्या धोरणांमुळे धार्मिक असहिष्णूता वाढत होती. अनेक ठिकाणी जबरदस्तीने धर्मांतर, मंदिरांचा विध्वंस आणि धार्मिक आस्थांवर कठोर निर्बंध लादले जात होते. अशा परिस्थितीत श्री गुरु तेग बहादूर साहिबजींचे गुरु-पद स्वीकारणे ही केवळ आध्यात्मिक जबाबदारी नव्हे, तर एक मोठे ऐतिहासिक आव्हान होते.

गुरु तेग बहादूर साहिबजींनी आपल्या गुरु-कालावधीत व्यापक प्रवास केला. पंजाबपासून बंगाल, बिहार, आसाम तसेच पूर्व भारतातील अनेक भागांत त्यांनी भ्रमण केले. या यात्रांचा उद्देश केवळ शीख पंथाचा विस्तार नव्हता, तर लोकांमध्ये निर्भयता, आत्मसन्मान आणि ईश्वरावरील खरी श्रद्धा जागवणे हाच होता. ईश्वर एकच आहे आणि सर्व मानव समान आहेत, हे ते शिकवत. जात, धर्माच्या पलीकडे जाऊन सत्य, करुणा आणि प्रेमाचा मार्ग स्वीकारणे हीच खरी भक्ती आहे, असा त्यांचा संदेश होता.

गुरु तेग बहादूरजींची वाणी अत्यंत गूढ व तात्त्विक आहे. त्यांच्या रचना गुरु ग्रंथ साहिबमध्ये संकलित असून त्यामध्ये जीवनाची नश्वरता, मायेची असारता आणि ईश्वरभक्तीचा सखोल संदेश आढळतो. सुख-दुःख, मान-अपमान, भय-लोभ यापलीकडे जो जातो, तोच खऱ्या अर्थाने मुक्त आहे, असे ते सांगतात. आजही त्यांची वाणी माणसाला अंतःकरणाने मजबूत बनण्याची आणि बाह्य परिस्थितींनी विचलित न होण्याची प्रेरणा देते.

गुरु तेग बहादूरजींचे सर्वात महान व ऐतिहासिक योगदान म्हणजे धार्मिक स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी दिलेले त्यांचे सर्वोच्च बलिदान होय. काश्मीरमधील पंडितांवर जबरदस्तीने दुसरा धर्म स्वीकारण्याचा दबाव टाकला जात होता. आपली श्रद्धा, संस्कृती आणि जीवनपद्धती वाचवण्यासाठी ते व्याकुळ झाले होते. जेव्हा ते गुरु तेग बहादूर साहिबजींकडे गेले, तेव्हा गुरुजींनी ही वेदना केवळ एका समुदायाची समस्या मानली नाही, तर तिला संपूर्ण मानवतेच्या व धर्मस्वातंत्र्याच्या प्रश्नाशी जोडले.

**डॉ.अमरजीत कौंके**
पंजाबी व हिंदी भाषेतील प्रख्यात लेखक
संपर्क : ९८१४२३१६९८ पटियाला, पंजाब

कोणत्याही व्यक्तीला आपल्या श्रद्धेनुसार जगण्याचा अधिकार आहे आणि कोणतीही सत्ता हा अधिकार हिरावून घेऊ शकत नाही, असे श्री गुरु तेग बहादूरजींनी ठामपणे सांगितले. भीषण परिणामांची जाणीव असूनही त्यांनी काश्मिरी पंडितांच्या रक्षणाचा संकल्प केला. हा त्यांच्या जीवनातील सर्वात धैर्यशील आणि ऐतिहासिक निर्णय होता.

ही बाब तत्कालिन शासकांच्या दरबारापर्यंत पोहोचताच श्री गुरु तेग बहादूरजींना दिल्लीला बोलावण्यात आले. तत्कालिन शासकांचा धर्म स्वीकारल्यास त्यांचे प्राण वाचतील आणि मान-सन्मान व सुविधा मिळतील, असे सांगण्यात आले. पर्यायाने चमत्कार दाखवण्याची मागणीही करण्यात आली. मात्र गुरुजींनी दोन्ही प्रस्ताव नाकारले. धर्मांतर म्हणजे आत्म्याशी द्रोह, तर चमत्कार दाखवणे म्हणजे ईश्वराच्या नावाचा अपमान, असे त्यांचे मत होते. जीवनाची किंमत मोजावी लागली तरी सत्य आणि विवेकाचा मार्ग स्वीकारण्याचा त्यांनी निर्धार केला.

इसवी सन १६७५ मध्ये दिल्लीच्या चांदणी चौकात गुरु तेग बहादूरजींना सार्वजनिकरीत्या शहीद करण्यात आले. त्यांच्या समोरच त्यांचे तीन परम शिष्य भाई मती दास, भाई सती दास आणि भाई दयाल दास यांचा अमानुष छळ करण्यात आला, तरीही गुरु तेग बहादूरजी ठाम राहिले. त्यांनी मृत्यू स्वीकारला; पण आपल्या तत्त्वांशी तडजोड केली नाही. भारतीय इतिहासात धार्मिक स्वातंत्र्यासाठी दिलेले हे एक अद्वितीय व अनुपम बलिदान आहे.

श्री गुरु तेग बहादूर साहिबजींच्या शहादतीचा दूरगामी परिणाम झाला. या बलिदानाने हे स्पष्ट केले की भारताची आत्मा सहिष्णुता, विविधता आणि धार्मिक स्वातंत्र्यात दडलेली आहे. त्यांचे पुत्र गुरु गोबिंद सिंहजींनी या शहादतीतून प्रेरणा घेऊन खालसा पंथाची स्थापना केली आणि अन्याय, अत्याचार व असत्याविरुद्ध संघटित संघर्षाचा मार्ग खुला केला. अशा प्रकारे गुरु तेग बहादूरजींचा त्याग येणाऱ्या पिढ्यांसाठी धैर्य आणि आत्मसन्मानाचा शाश्वत स्रोत ठरला.

श्री गुरु तेग बहादूरजींचे जीवन हेही शिकवते की खरा धर्म केवळ आपल्या अनुयायांच्या रक्षणापुरता मर्यादित नसतो. त्यांनी आपले प्राण शीखांसाठी नव्हे, तर हिंदू पंडितांच्या धार्मिक स्वातंत्र्यासाठी अर्पण केले. यामुळे ते संकुचित धार्मिक सीमांपलीकडे जाऊन एक सार्वत्रिक मानवतावादी व्यक्तिमत्त्व ठरतात. मानवता संकटात असताना खरे संत व महापुरुष वैयक्तिक हितांपेक्षा समाजाच्या हितासाठी उभे राहतात, त्यांचे जीवन हा सक्षम पुरावा होय.

आजच्या काळात, जेव्हा जगातील अनेक भागांत धार्मिक असहिष्णुता, हिंसा आणि द्वेष वाढत आहेत, तेव्हा श्री गुरु तेग बहादूर साहिबजींचा संदेश अधिकच सुसंगत ठरतो. भीतीसमोर झुकणे सोपे असते; पण सत्यासाठी उभे राहणे हेच खरे धैर्य आहे, हे त्यांचे जीवन शिकवते. आत्मबल आणि नैतिक दृढता कोणत्याही सत्तेपेक्षा अधिक शक्तिशाली असते, हे त्यांनी सिद्ध करून दाखवले.

इतिहास केवळ विजेत्यांनी नव्हे, तर सत्य, धर्म आणि मानवतेसाठी प्राण अर्पण करणाऱ्या शहीदांनी घडतो, हाच संदेश गुरु तेग बहादूरजींचे जीवन व बलिदानातून आपल्याला मिळतो. अंधःकारातही मानवतेला प्रकाशाचा मार्ग दाखवला. धर्माचे रक्षण तलवारीने नव्हे, तर धैर्य, करुणा आणि सत्यनिष्ठेने होते, त्यामुळे श्री. गुरु तेग बहादूर साहिबजी यांचे नाव भारतीय उपखंडात सदैव अमर दीपसारखे प्रज्ज्वलित राहील...

# निमगाव वाघामध्ये चौथे ग्रामीण मराठी साहित्य संमेलन उत्साहात; मान्यवरांचा सत्कार

ज्योतिर्मय साहित्य

अहिल्यानगर- दजेदार साहित्य समाजाची प्रतिमा उंचावते व योग्य दिशा देते. गावातील तंटे गावातच मिटले पाहिजेत. त्यासाठी तंटामुक्ती समिती, महिला दक्षता कमिटी व ग्रामसुरक्षा दलाची निर्मिती आवश्यक आहे. पोलीस दलात काम करताना अनेक गावांना तंटामुक्त करून बक्षिसे मिळवून दिली असे प्रतिपादन राष्ट्रपती पोलीस पदक विजेते रतीलाल चौधर यांनी केले.


तालुक्यातील निमगाव वाघा येथे चौथे ग्रामीण मराठी साहित्य संमेलन मोठ्या उत्साहात पार पडले. या संमेलनात ज्येष्ठ व नवोदित साहित्यिक, कवी, शाहिर, कथाकथनकार यांच्या विचारांची मैफल रंगली होती. साहित्याच्या माध्यमातून



समाजप्रबोधन, संस्कार, एकोप्याचा संदेश देत या संमेलनाने ग्रामीण भागात वैचारिक चळवळीचा जागर करण्यात आला. हे संमेलन मेरा युवा भारत, जिल्हा क्रीडा कार्यालय, किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय आणि श्री नवनाथ युवा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले होते. संमेलनाचे उद्घाटन वालचंदनगर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक रतीलाल चौधर आणि अभिनेत्री गौरी रत्नपारखी यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी स्वागताध्यक्ष कवयित्री सरोज आल्हाट, संमेलनाध्यक्ष साहित्यिक सुभाष सोनवणे, ॲड. राजेश कावरे, संदीप बोरकर, नाना डोंगरे, सरपंच उज्वला कापसे, आत्माराम शेवाळे आदी उपस्थित होते. संमेलनात युवकांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. महिलांसाठी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. महिलांचा हळदी-कुंकूचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. काव्य व शाहिरीच्या माध्यमातून 'मुलगी वाचवा मुलगी शिकवा', सार्वजनिक स्वच्छता, संस्कार व सामाजिक जबाबदारी यावर आधारित काव्य व पोवाड्यांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

साहित्यिक सुभाष सोनवणे म्हणाले, ग्रामीण साहित्य संमेलनातून गावांना विकासाची दिशा मिळते. राजकारण विचारहीन होत असताना साहित्यिक व विचारवंतांनी समाजासाठी दीपस्तंभाची भूमिका बजावणे आवश्यक आहे.

दुपारच्या सत्रात काव्यसंमेलन रंगले. यात अहमद शेख, संजय बोरूडे, सारीका नळकांडे, बाळासाहेब मुन्तोडे, रूपचंद शिदोरे, दिलीप कापसे, बाळासाहेब कोठुळे, मनिषा गायकवाड, गिताराम नरवडे, निवृत्ती कानवडे आदी कवींनी सहभाग घेतला. कथाकथनकार बाळासाहेब देशमुख यांनी 'मानवतेचा धर्म' या विषयावर व्याख्यान दिले, तर शिवशाहीर शिवाजी थिटे यांनी पहाडी आवाजातील पोवाड्यांनी रसिकांची दाद मिळवली. रक्तदान करणाऱ्या युवकांचा यावेळी सत्कार करण्यात आला.




# शिल्परत्न पद्मभूषण राम सुतार

ज्योतिर्मय साहित्य

'सतत काम करत राहिलं तर कुठल्याही आजाराशिवाय १०० वर्षे माणूस जगू शकतो' हे त्यांचं वाक्य त्यांनी शब्दशः सत्य करून दाखवलं. शंभरी पार केलेल्या राम सुतार यांनी सुमारे २००च्या वर सुप्रसिद्ध ठरतील अशी शिल्पे घडवली. ज्यात व्यक्ती, समूह आणि म्युरल्स यांचाही सहभाग आहे. त्यांच्यासोबतची डॉ. गजानन शेपाळ यांची आठवण

ल्परत्न पद्मभूषण राम सुतार यांनी वयाची शंभरी पूर्ण केली. धुळे जिल्ह्यातील 'गोंदूर' या गावातील, एका बलुतेदार कुटुंबातील मुलगा १०० वर्षांपूर्वी जन्म घेऊन शंभर वर्षांनंतर साऱ्या विश्वाने दखल घ्यावी इतके दिहीमान कला-कार्य करून देशाच्या राजधानीत विसावला... ज्येष्ठ शिल्पकार राम सुतार यांचं जड देहातील कार्य थांबलं. फार वेदना झाल्या. संसदेवर अतिरेक्यांचा हल्ला झाला होता त्या वर्षीची आठवण.

लोकसभेचे सभापती प्रिं. मनोहर जोशी सर होते आणि नेमक्या दोनच महिन्यांनंतर संसदेच्या प्रांगणात, मुख्य प्रवेशद्वारावर छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळ्याचं अनावरण करण्यात आलं. तो पुतळा, बनवणारे हात महाराष्ट्राच्या खांदेशातील 'गोंदूर'च्या 'रामा'चे!! त्याच काळात 'अयोध्या' खटल्याची खूप चर्चा सुरू होती आणि माझ्या एका लेखात मी, लिहिलं की "आता संसदेवर अतिरेक्यांचा हल्ला होणार नाही. कारण महाराष्ट्राचा राजा छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा संसदेच्या प्रवेशद्वारावर आहे. ज्यांनी तो साकारला तो महाराष्ट्राच्याच खांदेशाचा सुपुत्र आहे आणि ज्याच्या नावात 'राम' आहे. त्यामुळे आता अयोध्येतील 'राम' ही लवकरच अयोध्येत येणार...!!" हे वाक्य सरांना एवढं भावलं की, त्यांनी तसेच जोशी सरांनीही खास संपर्क करून दाद दिली होती.

"काम करणाऱ्याला मरण कसलं?" असं ताजमध्ये शिल्पकार राम सुतार यांनी त्यांची मी मुलाखत घेतली तेव्हा सांगितलं होतं. ते तसंच आयुष्य जगले. त्यांचा ध्यास त्यांचा विचार होता, त्यांचा विचार त्यांचं चिंतन होतं, त्यांचं चिंतन त्यांचं मनन होतं आणि त्यांचं मनन हे त्यांच्या प्रज्ञेचं मूर्त स्वरूप होतं. "सतत काम करत राहिलं तर कुठल्याही आजाराशिवाय १०० वर्षे माणूस जगू शकतो' हे त्यांचं वाक्य त्यांनी शब्दशः सत्य करून दाखवलं.

वयाच्या दहाव्या वर्षी श्रीगणेशाची, मातीची मूर्ती, शाळेतल्या शिक्षकांना करून दाखवली, तेव्हा मिळालेली शाब्बासकीची पाठीवरची थाप, शिल्पकार राम सुतार यांना तब्बल ९ दशकं पुरून उरली. त्यांच्या



वास्तववादी विचारसरणीत त्यांनी वास्तववादी किंवा मूर्त शैलीतील मूर्ती व शिल्ये साकारलेली दिसतात. मग त्या शिल्पाकृतींच्या "प्रपोर्शनेट" शरीरकारासोबतच चेहऱ्यावरील भाव टिपण्यातील त्यांचं कसब हे अवर्णनीय तर आहेच; परंतु शिल्पातील बोलकेपणा देखील तितकाच वाखाणण्यासारखा असायचा. त्यांना 'मूर्त'- 'अमूर्त' या शैली प्रकारांबद्दल नेहमी जी मतं-मतांतरे होतात त्याचं वाईट वाटायचं." तरुण, अननुभवी चित्रकार व शिल्पकार यांच्या "अमूर्त" शैलीतील कामावर ते नाराज असायचे. खंत वाटायची त्यांना.

वास्तववादी मूर्त किंवा "रिॲलिस्टिक "शैलीचा अभ्यास सरावाने पूर्ण केल्यानंतच "ॲब्स्ट्रॅक्शन"कडे अर्थात अमूर्त शैलीकडे कलावंत आपोआप वळतो. असं ते नेहमी सांगायचे. भारतीय संस्कृतीतील अनेक महापुरुषांची, संतपुरुषांची आणि संत-विभुतींची शिल्ये त्यांनी साकारलीत. पैकी अगदी अलीकडील जगातील सर्वात उंच, 'स्टॅच्यु ऑफ युनिटी' हा "सरदार वल्लभभाई पटेल" यांचा पुतळा साऱ्या जगभरात चर्चिला जातो आहे. "महात्मा इन मेडिटेशन (ध्यानस्थ महात्मा) हे संसदेच्या आवारातील म. गांधीजींचे शिल्प राजमान्य आणि जगन्मान्य झाले. मध्य प्रदेशातील चंबळ नदीवरील गांधीसागरमध्ये ४५ फूट उंचीचे भव्य शिल्प पाहून तत्कालिन पंतप्रधान पं. नेहरूंनी त्यांना पंजाबातील भाका-नांगल येथील ५० फुटी श्रमिकांचे शिल्प साकारण्यास सांगितले, जे काम त्यांनी खूप आत्मियतेने केले.

त्यांच्या मूर्त शैली व तंत्र कौशल्यामुळे भारत सरकारने त्यांची भारतीय नेत्यांची शिल्ये उभारण्यासाठीचा अधिकृत शिल्पकार म्हणून नेमणूकच केली.

राजकारण्यांची जशी दिल्लीत लॉबी असते, तशीच प्रारंभी दिल्लीतील प्रस्थापित कला वर्तुळाकडून राम सुतार यांना मोठा त्रास झाला. संघर्षाचा कडेलोट झाला; परंतु मुळात महाराष्ट्राच्या मातीत जन्मलेले रामजी त्यांनी त्यांच्या रामबाणाने दिल्लीतील लॉबीवाल्यांना घायाळ केले. अत्यंत शांत, मीतभाषी, सोज्वळ तरीही हाताच्या कौशल्यांसाठी आणि सूक्ष्म अभ्यासात्मक निरीक्षणासाठी कठोर

**डॉ. गजानन शेपाळ**

तसेच कर्मठ असणाऱ्या राम सुतारांनी दिल्लीच्या दृश्यकला राज्याचा ताबा मिळवला.

देहभान विसरून काम कसं केलं जातं, याचं मूर्तिमंत उदाहरण म्हणजे शिल्पकार राम सुतार होय. एकदा तर ते घरी दोन दिवस आलेच नाहीत म्हणून कुटुंबीयांनी काळजीपोटी पोलिसांची मदत घेऊन त्यांना शोधले. तेव्हा ते त्यांच्या स्टुडिओत एका शिल्पसृजनाच्या चित्तात मग्न झालेले होते. तादात्म्य पावणं म्हणजे काय? त्याचे हे उदाहरण होय. पुतळ्याच्या भव्यतेमुळे शिडीवरून काम करीत असताना थोडासा तोल गेला आणि ते पडले. हात मोडला. हाताला प्लास्टर लावल्यावर त्यांनी उर्वरित काम केले होते. अनेक राष्ट्रीय पुरुष, नेते, धार्मिक व ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वे यांची कामे करताना 'राम'जींनी, पुतळ्यांमध्ये 'राम' आणला, शिल्पकार राम सुतार यांनी त्यांच्या कामाचा, त्यांच्या ज्ञानाचा आणि अनुभवांचा कधी अहंकार बाळगला नाही. एकदा अगदी वैयक्तिक स्तरावर ते म्हणाले होते, मला एक गोष्ट गेली अनेक वर्षे नेहमी खटकते, ती म्हणजे एखादी कलाकृती, मग ती पेंटिंग 'स्वरूपात असो की "शिल्पाकृती वा मूर्ती" स्वरूपात असो. त्या कलाकृतीच्या अनावरणाला नेते, पुढारी जेव्हा येत असतात तेव्हा कुठेतरी मागे, लांब, दूर (जर ध्यानात राहिलं असेल तर) त्या कलाकाराला जागा दिलेली असते. एखादे नारळ वा पुष्पगुच्छ देऊन त्याची बोळवण केली जाते", त्यांनी ही व्यक्त केलेली खंत तितकीच संवेदनशील आहे. हे सत्यच असतं की कलाकृतीचा जेव्हा सन्मान, बोलबाला होतो, प्रसिद्धी मिळते तितका सन्मान त्या कलाकृती निर्मात्याला मिळतो का? हा अनुत्तरीत राहणारा प्रश्न आहे. कलाकृती ही केव्हाही चिरंतन असते. श्रेयवादाच्या भोवऱ्यात ती अडकत नसते. म्हणूनच शिल्पकार राम सुतार यांना "महाराष्ट्रभूषण" या सर्वोच्च पुरस्काराने महाराष्ट्र सरकारने सन्मानित केले. त्यांना 'टागोर' पुरस्कारही मिळाला आहे.

१९ फेब्रुवारी १९२५ रोजी गोंदूर, जि. धुळे येथे जन्म झालेल्या या महाराष्ट्रभूषणास दि. १८ डिसेंबर २०२५ देवाज्ञा झाली. शंभर वर्षे पार केलेल्या राम सुतार यांनी सुमारे २००च्या वर सुप्रसिद्ध ठरतील अशी शिल्पे घडवली, ज्यात व्यक्ती, समूह आणि म्युरल्स यांचाही सहभाग आहे.

त्यांच्या कलाकृतीच्या रूपाने ते या पुढीलही शेकडो वर्षे स्मरणात राहतील. त्यांनी ज्या ज्या ठिकाणी खंत व्यक्त केली जसे की, ज्या कलाकाराच्या कलाकृतींचे सार्वजनिक ठिकाणी सत्ताधारी मंडळींच्या हस्ते अनावरण होत असते. त्या त्या कलाकाराला, सदर कार्यक्रमाच्या व्यासपीठावर सन्मानाने वागणूक द्यावी तसेच कलाकारांच्या मानधनाच्या रकमांना विलंब लागू नये अशी धोरणात्मक योजना संबंधितांनी आखलेली असावी. हे जरी आपण आणि आपल्या संबंधित केंद्र सरकारांनी अमलात आणले तरी खऱ्या अर्थाने शिल्पकार राम सुतार यांना श्रद्धांजली वाहिली असे म्हणता येईल.

***

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559